केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने वितरित केलेला 1st Mother Sanction निधी व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा निधी वितरित करणेबाबत. (केंद्र व राज्य हिस्सा).

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः- समग्र २०२६/प्र.क्र. २४९ (ई- १८०५४१५)/ एसडी-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक: १७ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

(१) राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र, क्र. मप्राशिप/ PMJANMAN Mother Sanction/२०२६-२७ दि. १२.०८.२०२६.

(२) केंद्र शासनाचे आदेश, क्र. एफ क्र. १०-५/२०२६-SS.१, दि. १२.०८.२०२६.

(३) केंद्र शासनाचे आदेश, क्र. एफ क्र. १२२/ IFD/ २०२६-२७/ MH, दि. १०.०८.२०२६.

(४) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं २०२६/ प्र. क्र. ४०/ अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६ व दि.०७.०५.२०२६.

(५) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण २०२४/ प्र. क्र. ५१/ कोषा प्रशा-४, दि. ३०.०७.२०२५.

(६) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण २०२४/ प्र. क्र. ५१/ कोषा प्रशा-४, दि. ११.१०.२०२४.

(७) आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक, क्र. बीयुडी २०२४/प्र. क्र. ०२/ का-६, दि. ०१.०८.२०२४.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ येथील आदेशान्वये 1st Mother Sanction रु.१०३.५९ लाख इतका निधी वितरित केलेला आहे. केंद्र शासनाने वितरित केलेला निधी व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा निधी वितरित करण्याची विनंती राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी संदर्भ क्र. १ अन्वये केली आहे.

२. सन २०२३-२०२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये आदिम जमातीच्या (Particularly Vulnerable Tribal Groups (PVTGS)) उन्नतीसाठी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) या

योजनेची घोषणा करण्यात आलेली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाने या योजनेस मंजूरी दिलेली असून, याबाबतची घोषणा मा.पंतप्रधान महोदयांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या झारखंड या राज्यामधील खुट्टी या जन्मगावी दि.१५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जनजाती गौरव दिवसाचे औचित्य साधून केलेली आहे. या योजनेमध्ये राज्यातील ११ जिल्ह्यांमधील (चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, यवतमाळ) कातकरी, कोलाम व माडींया गोंड या आदिम जमातीचा समावेश आहे. या आदिम जमातीमधील विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निवासी वसतीगृह तसेच व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासासाठीच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी विचारात घेऊन तसा आराखडा तयार करून केंद्र शासनास राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्रस्ताव सादर केला होता.

३. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) योजनेसाठी केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण (केंद्र: राज्य) ६०:४० असे आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाने दि. १२.०८.२०२६ रोजीच्या आदेशान्वये 1st Mother Sanction वितरित केलेला निधी "मागणी क्रमांक टी-५, (२२०२K९०९) (केंद्र हिस्सा ६० टक्के) करिता रु.१०३.५९ लाख व सदर निधीचा समरूप राज्य हिस्सा (४० टक्के) (२२०२K९१८) या लेखाशीर्षाखाली रु. ६९.०६ लाख असा एकूण रु. १७२.६५ लाख इतका निधी वितरित करण्याची बाब प्रस्तावित आहे.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाने उपरोक्त प्रमाणे उपलब्ध करुन दिलेला निधी व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा निधी खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) योजनेच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ येथील वितरित करावयाची तरतूद ही स्तंभ क्र. २ येथील लेखाशीर्षाकरिता मंजूर असलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात यावी.

(रक्कम रुपये- लाखात)

अ. क्र.	लेखाशीर्ष	सन २०२६-२७ या वर्षात अर्थसंकल्पिय तरतूद	वितरित करावयाची तरतूद
१	२	३	४
मागणी क्रमांक :- टी-५			
१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१६) प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२२०२K९०९), ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर)	६३.२५	२०.३५

२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१६) प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२२०२K९०९), ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	३४३७.७६	८३.२४
३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१७) प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२K९१८), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	४२.१७	१३.५७
४	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१७) प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२K९१८), ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान.	२२९१.८४	५५.४९

२. सदर अनुदान सशर्त अनुदान असुन यापुर्वी वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे. या अनुदानाच्या अटी व शर्ती सदर शासन निर्णयात नमुद केलेल्या आहेत.

३. सदर खर्च संदर्भाधिन वित्त विभागाचे दि. ०९.०४.२०२६ व दि. ०७.०५.२०२६ रोजीचे परिपत्रक व आदिवासी विकास विभागाचे दि. ०६.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार करण्यात यावा.

४. सदर निधी सायबर कोषागार कार्यालयामार्फत (कोषागार संकेतांक-८१०१) आहरित करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. समग्र २०२५/ प्र. क्र. १४५/एसडी-१ दि.०९.०९.२०२५ व शासन निर्णय, क्र. संकीर्ण २४२५/ प्र. क्र. ६५/ अर्थसंकल्प (ई-१३४७२००), दि. १९.०९.२०२५ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच देयके आहरण व संवितरण करण्याकरिता उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावित निधी आहरित व वितरित करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करावे.

५. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी केंद्र शासनाचे संदर्भाधिन दि. १०.०८.२०२६ व दि.१२.०८.२०२६ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निदेशानुसार व सन २०२६-२७ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक प्रकल्प मान्यता मंडळाने (PAB) मंजूर केलेल्या समग्र शिक्षा योजनेच्या चालू योजनांच्या आवर्ती/अनावर्ती बाबीसाठी खर्च करावा. आवर्ती व अनावर्ती बाबींचा सविस्तर तपशील सोबत **परिशिष्ट "अ"** येथे जोडला आहे.

६. वित्त विभागाचे दि. ०९.०४.२०२५ व दि. ०७.०५.२०२६ रोजीचे परिपत्रक व आदिवासी विकास विभागाचे दि.०६.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार तसेच खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी.

७. अनुसूचित जमाती विशेष घटक योजना क्षेत्रात, अनुसूचित जमाती उपयोजना बाह्य क्षेत्रात केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

८. अनुसूचित जमाती विशेष घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतून अनुसूचित जमाती उपयोजना क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि अनुसूचित जमाती उपयोजना बाह्य क्षेत्रात फक्त वैयक्तीक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

९. अनुसूचित जमाती या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, लेखाशिर्षनिहाय /उप लेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्ट्ये इ.माहिती, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व शालेय शिक्षण विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे दि. ०९.०४.२०२६ व दि. ०७.०५.२०२६ रोजीचे परिपत्रक व आदिवासी विकास विभागाचे दि.०१.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१७१८०८२२२४४९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA
AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB30089069836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.17 18:09:30 +05'30'

(अनिरुध्द कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अध्यक्ष / सभापती, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

६. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.

७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.

८. मा. विधान सभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई (सर्व).

९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.

१०.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

११.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

१२.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

१३.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर.

१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.

१५.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३.

१६.सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग).

१७.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

१८. सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

१९.सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-५/ अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई

२०.अवर सचिव / कक्ष अधिकारी, लेखाशाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

२१.अवर सचिव / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय , मुंबई.

२२.निवड नस्ती (एसडी-१).

शासन निर्णय क्रमांक समग्र २०२६/ प्र. क्र. २४९ (ई- १८०५४१५)/एसडी-१, दि. १७.०८.२०२६ सोबतचे

"परिशिष्ट-अ"

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) योजनेच्या अनुसूचित जमाती (TSP) उपयोजनेसाठी घटकातील 1st Mother Sanction केंद्र हिस्सा व राज्य हिश्श्याकरिता वितरित करावयाच्या निधीचे आवर्ती / अनावर्ती बाबींनुसार तपशील:-

(रुपये- लाखात)

अ. क्र.	बाब	केंद्र शासन आदेश दिनांक	आवर्ती		अनावर्ती		एकूण
			केंद्र	राज्य	केंद्र	राज्य	
१	प्राथमिक शिक्षण	१२.०८.२०२६	०	०	८३.२४	५५.४९	१३८.७३
२	माध्यमिक शिक्षण		२०.३५	१३.५७	०	०	३३.९२
३	शिक्षक शिक्षण		०	०	०	०	०
एकूण			२०.३५	१३.५७	८३.२४	५५.४९	१७२.६५

ANIRUDDHA AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB30089069836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.17 18:09:54 +05'30'

(अ. अ. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन